Institute for Psychological Health
9th Floor, Shree Ganesh Darshan, Wing A2, LBS Marg, Bhn. Harinivas Circle & 3 Petrol Pump, Naupada, Thane (W) 400 602. India.
Phone: 2543 3270, 2536 6577, 25428183. Email: iph@healthymind.org
www.healthymind.org

# रौप्य महोत्सवी ठाणे वेध २०१६

**असे वेचले एकेक जण . . .**

**. . . . उजळून जाईल प्रत्येक क्षण**

ठाण्याच्या इन्स्टिटयूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ अर्थात आय.पी.एच. ह्या संस्थेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या 'वेध' ह्या व्यवसाय प्रबोधन परिषदेचे यंदाचे पंचविसावे वर्ष. 'सुदृढ मन सर्वांसाठी' हे ध्येयवाक्य घेऊन सत्तावीस वर्षांपूर्वी ह्या संस्थेने आपली वाटचाल सुरु केली तेव्हा जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु व्हायची होती. भारताने आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरु केली नव्हती. संगणकीय जगाला आकार आला नव्हता. इंटरनेट हा शब्द अवगत नव्हता. केबल टीव्हीची पहाट होती आणि फोन 'मोबाईल' होण्याची कल्पनाही उगवलेली नव्हती.

अशा काळामध्ये 'करीयरची दिशा आणि लय' म्हणजेच Direction & Rhythm दाखवणारी ही कल्पना अक्षरशः क्रांतीकारक होती. 'वेध' ह्या नावाचे इंग्रजी रूपांतर आहे Vocation Education Direction & Harmony.

विविध करीयरमधल्या यशस्वी व्यक्तींचे जीवनप्रवास Live गप्पांद्वारे उलगडून दाखवणारी ही परिषद तेव्हापासून दर वर्षी ठाण्यामध्ये भरत असते. आता ठाण्याबरोबरच अहमदनगर (१० वर्षे) औरंगाबाद (१० वर्षे), पुणे-नाशिक - लातूर (६ वर्षे), कल्याण (३ वर्षे), परभणी (२ वर्षे), कोल्हापूर आणि पेण (ह्या वर्षीपासून) अशा

एकदोन नव्हे तर दहा शहरांमध्ये वेधचे स्थानिक कार्यकर्ते ह्या परिषदेचे आयोजन करतात.

ठाण्याची पंचविसावी परिषद दिनांक ९,१०,११ डिसेंबर रोजी ठाण्याच्या समर्थसेवक मंडळाच्या मैदानावर भरणार असून एकूण चौदा सत्रांमध्ये एकूण एकोणीस 'इंटरेस्टिंग' व्यक्तींबरोबर गप्पा करण्याची संधी ठाणेकरांना मिळणार आहे.

वेध व्यवसाय परिषद ही ज्ञानरंजनाची मैफल असते आणि हजारो विद्यार्थी, पालक, शिक्षक ह्या ठाण्याच्या 'सवाई' संमेलनामध्ये सहभागी होत असतात. ह्या वर्षीच्या परिषदेचे सूत्र आहे निर्मिती आणि नियोजन अर्थात Managing Innovation'.

शुक्रवार ९ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता परिषदेमध्ये दोन 'बीज-संवाद' सादर केले जाणार आहेत. निर्मिती आणि नियोजनाच्या संदर्भात माणूस आणि निसर्ग ह्यांच्या बदलत्या नात्याचा वेध घेणार आहेत पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर. गेली पंचवीस वर्षे ह्या विषयावर सातत्याने अभ्यास, भ्रमंती  आणि लेखन करणारा हा कार्यकर्ता त्याच्या रोखठोक वक्तृत्वासाठी प्रसिद्ध आहे. 'बखर एका पर्यावरणवाद्याची' अशा पुस्तकांबरोबरच लॅरी बेकर, डॉ. स्वामीनाथन अशा दिग्गजांचे चरित्रलेखनही त्यांनी केले आहे. स्वतःची साऱ्या जगाची सफर ते ह्या निमित्ताने सर्वांसमोर मांडणार आहेत.

असाच एक 'जग पाहिलेला माणूस' येणार आहे त्यानंतरच्या बीजसंवादासाठी. दिल्लीला केंद्रिय परराष्ट्र खात्यामध्ये प्रधान सचीव असलेले ज्ञानेश्वर मुळे मराठी वाचकांना ज्ञात आहेत ते त्यांच्या लेखनामुळे. अमेरिका, जपान, सिरीया, मालदिव अशा विविध वकीलातींमध्ये काम करणाऱ्या ह्या IFS अर्थात भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्याच्या प्रवासाची सुरुवात झाली ती ग्रामीण महाराष्ट्रातल्या एका खेड्यापासून. प्रत्येक माणसाने स्वतःच्या व्यवसायाचे आणि आयुष्याचे नियोजन कसे करावे आणि त्यातून कर्तृत्वाची निर्मिती कशी करावी ह्यासंदर्भात ते बातचीत करणार आहेत. त्यांच्या प्रवासातल्या अनेक रोचक आणि रोमांचक घटना ते मांडणार आहेत. ह्या

सत्राची पूर्वतयारी म्हणून त्यांच्या करीयरवर आधारीत 'जिप्सी' हा लघुपट यू-ट्यूबवर पहायला हरकत नाही.

शनिवार दिनांक १० डिसेंबर आणि रविवार दिनांक ११ डिसेंबरला वेध परिषदेची सत्रे दुपारी तीनला सुरु होणार आहेत. प्रत्येक दिवशी सहा सत्रे असून तीन सत्रांनंतर वीस मिनिटांचे मध्यंतर असेल.

शनिवारच्या सफरीला सुरुवात करतील दोन तरुण आंतरराष्ट्रीय खेळाडू. शुभम वनमाळी हा आहे विशीतला तरुण. आंतरराष्ट्रीय स्तरावर जलतरण करणाऱ्या शुभमने गेल्या दोन वर्षांमध्ये चार कठीण खाड्या पार केल्या आहेत. ह्यात ब्रिटीश खाडी, जिब्राल्टरची सामुद्रधुनीपासून ते अमेरिकन खाडीपर्यंतच्या कठीण मोहिमांचा समावेश आहे. शालेय जीवनामध्ये त्याला Learning Difficulty अर्थात Dyslexia का सामना करावा लागला. परंतु खेळाने त्याचे जीवनच बदलले. आज तो BMM चा अभ्यासक्रमही यशस्वीपणे करत असून पुढच्या दोन वर्षांमध्ये 'सप्तसमूद्र' पार करणार आहे. अशीच कहाणी आहे ओजस कुलकर्णीची. हा तरुण बुद्धिबळपटू आंतरराष्ट्रीय स्तरांवर झपाट्याने प्रगती करत असून 'इंटरनॅशनल मास्टर्स' रेटींगपासून काही पावलेच मागे आहे. हे दोन्ही खेळाडू आयपीएच संस्थेच्या क्रीडामानस विभागामध्ये डॉ. शुभांगी दातार ह्यांचेकडून नियमित मार्गदर्शन घेत असतात.

त्यानंतर भेटीला येणार आहे कॅप्टन सिद्धार्थ चक्रवर्ती. 'सी शेफर्डस' ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. सागरी जीवनावर बेकायदेशीर घाला घालणाऱ्या आंतरराष्ट्रीय हितसंबंधांच्या विरोधात 'सागरी सत्याग्रह' करणारी धाडसी संस्था. त्यांच्या एका जहाजाचा हा तरुण भारतीय कॅप्टन. सील्स, व्हेल्स अशा जलचरांची मोकाट हत्या करणाऱ्या बोटींना थांबवणे हे त्याचे काम. नाशिकचा हा तरुण, मर्चंट नेव्हीमध्ये दहा वर्षे काम केल्यावर त्या सुरवासीन, पैसे देणाऱ्या आयुष्याला कंटाळला आणि थेट ह्या प्रवासाला लागला. त्याची विलक्षण साहसी कहाणी. नाशिकच्या शुद्ध मराठीत ऐकणे ही मेजवानी असणार आहे.

त्यानंतर आहेत केईएम हॉस्पिटलचे डीन डॉ.अविनाश सुपे. निष्णात सर्जन म्हणून त्यांनी केईएम रुग्णालयात पूर्णवेळ काम करण्याचा निर्णय घेतला. उत्तम फोटोग्राफर, हिंमती गिर्यारोहक, लोकप्रिय शिक्षक असलेल्या डॉ. सुप्यांनी केईएमचा सारा प्रशासकीय डोलारा कसा सावरला हे त्यांच्या तोंडून आपण ऐकणार आहोत.

हाडाच्या कलाकार आणि संगीतगुरू असलेल्या निर्मितीक्षम श्रुती सडोलीकर-काटकर ह्यांच्यासमोर 'नियोजना'चे असेच प्रशासकीय आव्हान निर्माण झाल लखनौच्या पंडीत भातखंडे संगीत विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून त्यांची नियुक्ती झाली तेव्हा. श्रुतीताईंनी गेल्या काही वर्षांमध्ये गाजवलेल्या वेगळ्याच कर्तृत्वाची कहाणी सांगण्यासाठी त्या येताहेत थेट लखनौवरून.

कुठे Embryology म्हणजे गर्भघडणीच्या विज्ञानातील संशोधन आणि कुठे बँकेतली नोकरी . . . पण अशी अजब वाटणारी निवड करायची होती शुभा पानसे ह्या तरुण युवतीला . . . तिने बँकेची निवड केली आणि निवृत्त होताना त्या झाल्या अलाहाबाद बँकेच्या चेअरमन शुभलक्ष्मी पानसे. आज बँकिंग क्षेत्रातली ज्ञानी आणि अधिकारी व्यक्ती मानल्या जाणाऱ्या शुभाताई अनेक बडया कंपन्यांच्या संचालकपदी आहेत. त्यांचा प्रवास त्या घेऊन येताहेत खास 'वेध'साठी.

अशीच चित्तवेधक कहाणी आहे आय ए एस अधिकारी अश्विनी भिडे ह्यांची. आज मुंबई मेट्रोच्या त्या व्यवस्थापकीय संचालिका असून घाटकोपरपासून फोर्टपर्यंत जाणारा ईस्टर्न फ्रीवेच्या योजनेपासून पुर्णत्वापर्यंत नेण्यामागे त्यांचे नेतृत्व होते. महाविद्यालयीन जीवनात अक्षरशः तळपणारी अश्विनी प्रशासकीय क्षेत्रात कशी आली ही आगळीवेगळी गाथा खास 'वेध'साठी.

ऐन पंचविशीतला मधुर पडवळ  हा तरुण आज भारतीय रॉक संगीतामधला एक उत्तम गिटारीस्ट आहे. तो वादक आहे, संगीत नियोजक आहे, वेस्टर्न बँडसचा अविभाज्य भाग आहे . . . पण त्याची खासियत आहे 'FOLKS WAGON'. भारतातील प्रत्येक प्रांतातील दुर्मीळ लोकवाद्यांचे जतन करणारा हा आगळावेगळा म्युझीयम. वेधच्या व्यासपीठावरून मधुर

अनेक तालवाद्ये, वायुवाद्ये वाजून दाखवणार आहे. हा तरुण पंचवीसहून अधिक वाद्ये वाजवू शकतो. प्राचीन भारतीय संगीतपरंपरेचा हा भन्नाट आविष्कार हे यंदाच्या ठाणे वेधचे जोरदार वैशिष्टय ठरणार आहे. . . . काश्मीर ते केरळ असा हा Live प्रवास अनुभवायलाच हवा.

असाच एक अवलिया आहे दिल्लीचा विकी रॉय. आज आंतरराष्ट्रीय ख्यातीचा फोटोग्राफर असलेला विकी, फोर्बज मासिकाच्या यशस्वी यादीमध्ये आहे. पश्चिम बंगालमधल्या पुरुलिया भागातून वयाच्या अकराव्या वर्षी तो पळाला आणि आला दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवर. त्या प्लॅटफॉर्मवर राहून जगण्याशी झगडा करताना त्याच्या हातात कॅमेरा कसा आला आणि त्याचे आयुष्य कसे बदलले हे त्याच्याच तोंडून ऐकायला हवे. विकी सोबत येणार आहे त्याच्या अप्रतिम छायाचित्रांचे सिलेक्शन. आपण ते पाहू शकणार आहोत मोठ्या एलसीडी स्क्रीनवर!

असाच एक आगळा अनुभव घेऊन आपल्यासमोर येणार आहे मुंबई आयआयटीच्या 'प्रथम' ह्या उपग्रहाची विद्यार्थी-संशोधक टीम! . . . विद्यार्थ्यांनी योजलेला, बनवलेला आणि आज अंतराळात कार्यरत असा हा प्रकल्प नेमका घडला कसा ते दृकश्राव्य पद्धतीने सादर केले जाणार आहे exculsively ठाणे वेधच्या प्रेक्षकांसाठी.

रौप्यमहोत्सवी वेधला एक वैचारीक परिमाण देण्यासाठी योजलेली आहेत दोन खास सत्रे. ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ हे 'हिंदु' ह्या दैनिकाचे ग्रामीण संपादक असून 'दुष्काळ आवडे सर्वांना' हा त्यांचा ग्रंथ देशभर खळबळ माजवून गेला. ग्रामीण भारताचे प्रश्न सातत्याने जगासमोर मांडणाऱ्या साईनाथ ह्यांना आशिया खंडाचे नोबेल मानले जाणारे म्यॅगसेसे पारितोषिक मिळालेले आहे. सध्या 'PARI' ह्या त्यांच्या संस्थेतर्फे इंटरनेटच्या माध्यमातून ते संशोधन तसेच ग्रामीण बारशाच्या जतनाचे काम करत आहेत. त्यांच्याबरोबरची दिलखुलास बातचीत हे यंदाच्या वेधचे खास सत्र!

दुसरे सत्र आहे डॉ. रोहन शेट्टी ह्या तरुण संशोधकाचे. मराठी, इंग्रजी, संस्कृत, हिंदी, कोकणी, तेलगू अशा अनेक भाषांमध्ये पारंगत असा रोहन सध्या जर्मनीमध्ये असून पीएचडीच्या आधी त्याने जर्मनी व इग्लंड मधून डबल मास्टर्स केले. आधुनिक

जीवशास्त्र ते भारतीय तत्वज्ञान अशा विविध विषयांमध्ये गती असलेल्या रोहनला बारावीच्या परीक्षेमध्ये केमेस्ट्री मध्ये पस्तीस गुण पडले होते.

भारतात कुठे फारसा वाव नाही म्हणून त्याने आणि त्याच्या मध्यमवर्गीय कुटुंबाने निर्णय घेतला परदेशात जाऊन पुढचे शिक्षण घेण्याचा . . . लंडनच्या मॅकडोनाल्डमध्ये बशा धुण्यापासून ते किचनपर्यंतचे काम करणाऱ्या रोहनने पुढे अद्‌वितीय यश मिळवले . . . संशोधनाच्या निमित्ताने जगभर फिरताना त्याने पीएचडीसाठी निवड केली भारतातल्या देवरायांची . . . एका उमद्या तरुणाबरोबरचे जादुई सत्र अनुभवायचे तर 'वेध'ला पर्याय नाही.

विदर्भातल्या एका खेड्यामधला 'फासेपारधी' जमातीतला मतीन भोसले. 'गुन्हेगार' हा शिक्का लावलेली ही जमात. हा मुलगा शिकला आणि शिक्षक बनला पण त्याला ओढ होती त्याच्यासारख्या अनेकांचे भविष्य घडवण्याची. त्यातून निर्मिती झाली 'प्रश्नचिन्ह' नावाच्या निवासी शाळेची. साडेचारशे मुलांचे भविष्य घडवणारी ही शाळा सुरु झाली 'भिक मांगो' नावाच्या आगळ्या आंदोलनातून . . . स्थळ होता तुरुंग . . . आणि दिवस स्वातंत्र्यदिनाचा . . . विश्वास बसणार नाही असे वास्तव घेऊन मतीनबरोबर वेधमध्ये येत आहेत त्याच्या शाळेतले काही विद्यार्थी.

आतापर्यंतच्या या त्रोटक ओळखीतून तुमच्या लक्षात आले असेल की ह्या वर्षीच्या वेधमध्ये आपल्याला कोणते विचारधन मिळणार आहे! . . . ह्या साऱ्यांशी आपल्या खास शैलीत संवाद साधणार आहेत मनोविकासतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी. सोबत आहेत पत्रकार रविंद्र मांजरेकर आणि मानसतज्ज्ञ डॉ. दीपिका दाबके.

लवकरात लवकर आपली नोंदणी करण्यासाठी ई-मेल वर संपर्क करा iphthane@gmail.com किंवा फोन करा ९५९४०९९४२२ ह्या नंबरवर अथवा प्रत्यक्ष येऊन प्रवेशिका घेऊन जा.

आय पी एच : ९वा मजला, श्री गणेश दर्शन, एल. बी.एस. मार्ग, हरिनिवास सर्कल आणि तीन पेट्रोल पंप जवळ, नौपाडा, ठाणे (प) (सकाळी १० ते रात्री ८)

मॅजेस्टीक बुक स्टॉल : राम मारुती रोड, ठाणे (प) ( सोमवारी बंद)